लोकमत



शिवाजी विद्यापीठात सोमवारी खासदार उदयनराजे यांचे शाल, शिवाजी महाराज यांचा पुतळा आणि ग्रंथभेट देऊन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत केले. यावेळी डावीकडून पी. एस. पाटील, विलास नांदवडेकर उपस्थित होते.

# साताऱ्यातील विद्यापीठ उपकेंद्राचा प्रश्न मार्गी लावू

## उदयनराजे यांचे आश्वासन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने सातारा जिल्ह्यातील उपकेंद्रासाठी काय हवे, ते सांगावे आणि त्यासाठी आम्ही सर्व स्तरांवर पाठपुरावा केला जाईल. एक आदर्श शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचा आमचा मानस आहे. सातारा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन उपकेंद्राच्या जागेसाठीचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे खासदार उदयनराजे भोसले यांनी सोमवारी येथे सांगितले.

विद्यापीठात खासदार भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. केवळ आर्थिक आणि भौगोलिक कारणांनी कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याची आपली जबाबदारी आहे. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करवून घेण्याच्या दृष्टीने स्थानिक पातळीवर विद्यापीठाचे उपकेंद्र अत्यंत महत्त्वाचे ठरणार असल्याचे खासदार भोसले यांनी सांगितले.

विद्यापीठाची उपकेंद्रे अगर उपपरिसर निर्माण करीत असताना त्या ठिकाणी आम्हाला केवळ आणखी एक महाविद्यालय अगर विद्यापीठाचे विस्तारित स्वरूप अभिप्रेत नाही. स्थानिक संसाधने, तेथील भौगोलिक वैशिष्ट्ये या सर्वांचा समावेश करणे,

### ...सक्षम व्हायला हवे

गावपातळीवर विविध उद्योग-व्यवसाय, रोजगार उपलब्ध करून देणे. स्वतःचा उद्योग-व्यवसाय उभारून मालक होण्यासाठी युवकांना मदत करण्याचे धोरण असावे. त्याअंतर्गत त्यांना आवश्यक त्या सर्व पायाभूत सोयी-सुविधा स्थानिक पातळीवर निर्माण करण्यात येतील. अनेक नवे अभ्यासक्रम येत आहेत, येऊ घातले आहेत. त्यांचा लाभ आपल्या विद्यार्थ्यांना देण्यासाठी आपण सक्षम व्हायला हवे, असे खासदार भोसले यांनी सांगितले.

त्यांची नव्या शैक्षणिक धोरणाशी सांगड घालून विद्यार्थ्यांना स्थानिक वैशिष्ट्यांची रोजगाराभिमुखता प्रदान करून संपन्न व समृद्ध बनविणारे अभ्यासक्रम अपेक्षित आहे. शिक्षणासह संशोधन व विकास, कौशल्य विकास आणि अन्य समाजाभिमुख उपक्रमासाठी उपकेंद्र उपयुक्त राहील, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

यावेळी अधिसभा सदस्य डी. जी. बनकर, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव वैभव ढेरे उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

लोकमत

# दूरशिक्षण केंद्रातर्फे चार अभ्यासक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत या वर्षापासून चार अभ्यासक्रम ऑनलाइन स्वरूपात सुरू करण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यात एमबीए, एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) आणि एम.एस्सी. (संगणकशास्त्र) असे हे चार अभ्यासक्रम आहेत.

विद्यापीठास नॅकचे ए-प्लस प्लस मानांकन प्राप्त झाल्यानंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडून विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. त्यामुळे जगभरातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होणार आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाने केले परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ४३० अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल सोमवारपर्यंत जाहीर करण्यात आले आहेत. यात बी.एस्सी., बी. कॉम. बी. व्होक, बी. टेक, एम. टेक अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रातील मार्च-एप्रिल २०२१ च्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारपासून पदव्युतर अभ्यासक्रम प्रथम वर्षाच्या परीक्षांना प्रारंभ झाला आहे. एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.एस. डब्ल्यू., एमसीए अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. १२४ पैकी १२२ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

12 OCT 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य

## खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे यांची ग्वाही : कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सातारा येथील नियोजित उपकेंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी दिली. मंगळवार, दि. १२ रोजी सातारा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन उपकेंद्राच्या जागेसाठीचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. शिवाजी विद्यापीठात सोमवारी सायंकाळी खासदार उदयनराजे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

खासदार उदयनराजे भोसले म्हणाले, केवळ आर्थिक आणि भौगोलिक कारणांनी कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याची आपली जबाबदारी आहे. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करवून घेण्याच्या दृष्टीने स्थानिक पातळीवर विद्यापीठाचे उपकेंद्र अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. एकविसाव्या शतकात नवतंत्रज्ञानाचा, नवज्ञानाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. माहिती तंत्रज्ञान, रोबोटिक्स, अभियांत्रिकीच्या आंतरविद्याशाखीय शाखा असे अनेक नवे अभ्यासक्रम येत आहेत, येऊ घातले आहेत.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षीय भाषणात म्हणाले, शिवाजी विद्यापीठाची उपकेंद्रे अगर उपपरिसर निर्माण करत असताना त्या ठिकाणी आम्हाला केवळ 'आणखी एक महाविद्यालय अगर विद्यापीठाचे विस्तारित स्वरूप' अभिप्रेत नसून स्थानिक संसाधने, तेथील भौगोलिक वैशिष्ट्ये या सर्वांचा समावेश करून त्यांची नव्या शैक्षणिक धोरणांशी सांगड घालून विद्यार्थ्यांना स्थानिक वैशिष्ट्यांची रोजगाराभिमुखता प्रदान करून संपन्न व समृद्ध बनविणारे अभ्यासक्रम अपेक्षित आहेत. त्याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज, प्रवास व पर्यटन, औषधनिर्माण, व्यवस्थापन आणि अन्न विज्ञान व तंत्रज्ञान अशा निवडक ताज्या विद्या शाखांमधील अभ्यासक्रमांची सुरुवात करण्यासाठीही उपकेंद्रे उपयुक्त ठरतील.



**कोल्हापूर : खा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचे स्वागत करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिर्के. सोबत ॲड. डी. जी. बनकर, अमित कुलकर्णी, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर आणि अजित चौगुले.**

याप्रसंगी खासदार उदयनराजे भोसले यांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, ग्रंथभेट, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची प्रतिकृती आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी यांनी विद्यापीठाने सातारा येथे उपकेंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने चालवलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी अधिसभा सदस्य डी. जी. बनकर, वित्त व लेखाधिकारी अजित

12 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साताऱ्यातील उपकेंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य

## खासदार उदयनराजे भोसले; कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या उपस्थितीत बैठकीत ग्वाही

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर : खासदार उदयनराजे भोसले यांचे छत्रपती शिवरायांचा पुतळा देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डी. जी. बनकर, अमित कुलकर्णी, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर.



कोल्हापूर, ता. ११ :शिवाजी विद्यापीठाच्या सातारा येथील नियोजित उपकेंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही खासदार उदयनराजे भोसले यांनी आज येथे दिली. उद्या (ता. १२) सातारा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन उपकेंद्राच्या जागेसाठीचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी सांगितले. खासदार भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत व कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीत ते बोलत होते.

श्री. भोसले म्हणाले, "केवळ आर्थिक आणि भौगोलिक कारणांनी कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करवून घेण्याच्या दृष्टीने स्थानिक पातळीवर विद्यापीठाचे उपकेंद्र अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. गावाकडून मोठ्या शहरांकडे होणारे विद्यार्थ्यांचे, कामगारांचे स्थलांतर रोखणे आणि त्यांना स्थानिक पातळीवर विविध उद्योग-व्यवसाय, रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या केंद्राच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील."

डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यापीठाची उपकेंद्रे, उपपरिसर निर्माण करीत असताना त्या ठिकाणी आम्हाला केवळ'आणखी एक महाविद्यालय अगर विद्यापीठाचे विस्तारित स्वरूप'अभिप्रेत नाही. स्थानिक संसाधने, तेथील भौगोलिक वैशिष्ट्ये यांचा समावेश करून त्यांची नव्या शैक्षणिक धोरणाशी सांगड घालायची आहे. विद्यार्थ्यांना स्थानिक वैशिष्ट्यांची रोजगाराभिमुखता प्रदान करून संपन्न व समृद्ध बनविणारे अभ्यासक्रम अपेक्षित आहे."

या वेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी यांनी विद्यापीठाने सातारा येथे उपकेंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने चालविलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. सुरुवातीला प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी आभार मानले. अधिसभा सदस्य डी. जी. बनकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव वैभव ढेरे उपस्थित होते.

### कामगार नको, उद्योजक बना

शहरांमध्ये जाऊन कामगार होण्यापेक्षा स्थानिक पातळीवर स्वतःचा उद्योग-व्यवसाय उभारून मालक होण्यासाठी युवकांना मदत करण्याचे धोरण यात अंतर्भूत आहे. त्या अंतर्गत आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा स्थानिक पातळीवर निर्माण करण्यात येतील. विद्यापीठाने उपकेंद्रासाठी काय हवे, ते सांगावे आणि त्यासाठी आम्ही पाठपुरावा करू, अशी ग्वाही खासदार भोसले यांनी दिली.

तरुण भारत

# 'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट'च्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' कंपनी (सेक्शन-८)च्या अध्यक्षपदी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड करण्यात आली आहे.



सेक्शन-८ कंपनीच्या संचालक मंडळाची पहिली बैठक मंगळवारी विद्यापीठातील कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांची एकमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन कुलगुरू डॉ. शिर्के यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते.

12 OCT 2021
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सातारा उपकेंद्रात रोजगाराभिमुख अभ्यासक्रम

## खासदार उदयनराजे भोसले यांची माहिती : पत्रकारांशी साधला संवाद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सातारा येथील उपकेंद्रात तेथील भौगोलिक परिस्थिती, जैवविविधता आणि पर्यटन याला अनुसरून अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहेत. तसेच काळानुसार कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम तयार करून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, अशी माहिती खासदार उदयनराजे भोसले यांनी दिली. शिवाजी विद्यापीठात कुलगुरूंबरोबर झालेल्या बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

विद्यापीठात खासदार उदयनराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत सातारा येथील उपकेंद्राबाबत चर्चा झाली. दरम्यान कुलगुरूंच्या हस्ते खासदार भोसले यांचा सत्कार करण्यात आला.

खासदार भोसले म्हणाले, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी साताऱ्यातील विद्यापीठाचे उपकेंद्र महत्त्वाचे ठरणार आहे. एकविसाव्या शतकात माहिती तंत्रज्ञान, रोबोटिक्स, अभियांत्रिकीच्या आंतरविद्याशाखीय शाखा असे अनेक नवे अभ्यासक्रम येत आहेत. स्थानिक पातळीवर उद्योग–व्यवसाय, रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या उपकेंद्राच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल. स्वतःचा



**कोल्हापूर : खासदार श्रीमंत उदयनराजे भोसले यांच्याशी चर्चा करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अमित कुलकर्णी.**

- **शिवाजी विद्यापीठाची घेतली सदिच्छा भेट**
- **स्थानिक पातळीवर सुविधा, आदर्श शिक्षण व्यववस्था देण्याचा मानस**

उद्योग–व्यवसाय सुरू करण्यासाठी स्थानिक पातळीवर पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. विद्यापीठाने दिलेल्या सूचनेनुसार उपकेंद्रात सोयी–सुविधा उपलब्ध करून आदर्श शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचा मानस आहे, असेही खासदार उदयनराजे भोसले यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, उपकेंद्रे उभारताना 'आणखी एक महाविद्यालय अगर विद्यापीठाचे विस्तारित स्वरुप' अभिप्रेत नसून स्थानिक संसाधने, तेथील भौगोलिक वैशिष्ट्ये यांचा समावेश करून त्यांची नव्या शैक्षणिक धोरणाशी सांगड घालून, रोजगाराभिमुख समृद्ध बनविणारे अभ्यासक्रम अपेक्षित आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज, प्रवास व पर्यटन, औषधनिर्माण, व्यवस्थापन आणि अन्नविज्ञान व तंत्रज्ञान अशा अभ्यासक्रमांची सुरुवात करण्यासाठीही उपकेंद्रे उपयुक्त ठरतील. शिक्षणाबरोबरच संशोधन व कौशल्य विकास आणि अन्य समाजाभिमुख उपक्रम यांसाठीही उपकेंद्र उपयुक्त ठरतील. व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी यांनी उपकेंद्राची माहिती दिली. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी अधिसभा सदस्य डी. जी. बनकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव वैभव ढेरे उपस्थित होते.

तरुण भारत

# इरॅस्मस प्लस प्रोग्रॅम प्रकल्प व्यवस्थापकांची विद्यापीठाला भेट

कोल्हापूर : युरोपियन युनीयन इरॅस्मस प्लस प्रकल्प व्यवस्थापकांनी शिवाजी विद्यापीठास भेट दिली. युरोपियन युनियनच्या इरॅस्मस प्लस संस्था अर्थसहाय्यीत, 'मिटिगेट द इम्पॅक्ट ऑफ फोर्थ इंडस्ट्रियल रिव्हॅल्युएशन ऑन इंडियन सोसायटी : एज्युकेशन रिफॉर्म फॉर फ्युचर अँड इन सर्व्हिस स्कूल टिचर्स'मध्ये शिवाजी विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग कार्यरत आहे. प्रकल्पासाठी सव्वाकोटींचे अर्थसहाय्य होणार आहे. प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी प्रकल्प व्यवस्थापक अल्डा टॉलुमी, सिलिया ग्वाटेमेलो यांनी विद्यापीठाला भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची भेट घेतली. प्रकल्पासाठी शिक्षणशास्त्र अधिविभागाला सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. विभाग प्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी स्वागत केले. गीतांजली जोशी यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. व्ही. एस. खंडागळे, उपकुलसचिव श्रीमती अडसूळे, सरस्वती कांबळे, सोनाली कोळी आदी उपस्थित होते.